**प्रेस नोट** दिनांक :– १५/११/२०२२

आरोपी लोकसेवक यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी करुन ती खाजगी इसम यांनी स्विकारल्याने अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने त्यांना ताब्यात घेतले बाबत.

| | |
|---|---|
| अँन्टी करप्शन ब्युरो /घटक | ठाणे |
| गुन्हा नोंद कमांक | --- |
| आरोपी लोकसेवकाचे/खाजगी इसमाचे नाव व कार्यालय | १) आरोपी लोकसेवक पोशि/रामचंद्र यशवंत बांगर, काशिमीरा पोलीस स्टेशन, मिरा–भाईंदर पोलीस आयुक्तालय<br>२) आरोपी खाजगी इसम श्री. श्याम चंदेश्वर पंडीत, व्यवसाय–चहाची टपरी |
| मागितलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रुपये |
| तडजोडीअंती ठरलेली लाचेची रक्कम | १५००/– रुपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | स्विकारलेली १५००/– रुपये |
| थोडक्यात हकीकत | यातील तकारदार यांचेकडे लोकसेवक पो.शि/बांगर यांनी तकारदार यांचे नव्याने चालु केलेले हॉटेल (ढाबा) सुरु ठेवणेकरीता तसेच रात्री उशिरा पर्यत चालू ठेवण्याकरीता **५ हजार रुपये लाचेच्या रक्कमेची** मागणी केल्याबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १५/११/२०२२ रोजी लोकसेवक पोशि/श्री. रामचंद्र यशवंत बांगर यांची तकारदार हे काशिमिरा पोलीस स्टेशन येथे येवुन समक्ष भेट घेतली असता, लोकसेवक पोशि/श्री. बांगर यांनी तकारदार यांचेकडे तडजोडीअंती १५००/– रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने लागलीच आज दि. १५/११/२०२२ रोजी काशिमिरा पोलीस स्टेशन येथे सापळा आजमाविला असता, सापळा कारवाई दरम्यान तकारदार हे लोकसेवक पोशि/श्री. बांगर यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्याकरीता समक्ष भेटले असता, लोकसेवक पोशि/बांगर यांनी काशिमिरा पोलीस स्टेशनचे समोरील रोडचे बाजूस असलेल्या चहा टपरीवाल्याकडे १५००/–रुपये लाचेची रक्कम देणेबाबत तकारदार यांना सांगितले.<br>त्यानुसार तकारदार यांनी चहावाल्याकडे १५००/– रु. लाचेची रक्कम दिली असता, नमुद चहाचे टपरीवरील श्री. श्याम चंदेश्वर पंडीत यांनी १५००/– रु. लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारले असता श्री. श्याम पंडीत यांना १२:५० वा. रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच लोकसेवक पोशि/बांगर यांना काशिमिरा पोलीस स्टेशन येथील कर्मचारी कक्षामधुन १३:०० वा. ताब्यात घेतले आहे. सदरबाबत गुन्हा नोंदविण्याची कारवाई काशिमिरा पोलीस स्टेशन येथे सुरु आहे. |

**मार्गदर्शनअधिकारी– मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

संपर्क पत्ता :– लाप्रवि ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ :–acbmaharastra@mahapolice.gov.in
ईमेल–spacbthane@mahapolice. Gov.in
अॅप्लीकेशन –acbmaharastra.net,
टोल फ्रि नंबर –१०६४, दुरध्वनी कमांक –०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसुअॅप्स् कमांक –९९३०९९७७००
दिनांक :– १५/११/२०२२

ASPatil

( अश्विनी पाटील )
पोलीस उप अधीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.